# माहितीचा अधिकार अधिनियम अन्वये माहिती

---

# संसर्गजन्य रोगांचे कस्तुरबा रुग्णालय

साने गुरुजी मार्ग,

मुंबई – ४०० ०११.

---

## <u>२०१६-२०१७</u>

# प्रस्तावना

## साने गुरुजी मार्ग येथील संसर्गजन्य रोगांचे कस्तुरबा रुग्णालय

मुंबई महानगरपालिकेचे संसर्गजन्य रोगांचे कस्तुरबा रूग्णालय हे आग्नेय आशियातील संसर्गजन्य रोगांचे सर्वात मोठे रूग्णालय आहे. कस्तुरबा रुग्णालयाची स्थापना १८९२ साली झाली . सर्व प्रकारच्या संसर्गजन्य रोगांचे रूग्ण ह्या रूग्णालयात दाखल केले जातात .

संसर्गजन्य रोग उदा. कांजण्या,गोवर,गालगुंड,ए.एफ.पी.,कावीळ (ए,बी,सी,इ आणि इतर कावीळ), ताप, विषमज्वर, मलेरीया, लेप्टो, डेंग्यू, एच१एन१, मस्तिष्कदाह, हगवण, उलटी- जुलाब, पटकी, घटसर्प, डांग्याखोकला, (क्षयरोग, गुप्तरोग, कृष्ठरोग व श्वानदंश वगळून ) आजाराने ग्रस्त असलेले रूग्ण येथे वेगळे ठेवण्यात येवून त्यांच्यावर उपचार केले जातात. प्लेग व पटकी ह्या रोगांची लागण झालेले रोगी सक्तीने ह्या रूग्णालयात हलविण्यात येतात.

२ शस्त्रक्रियागृहासह २५ खाटांचा भाजलेल्या रूग्णांचा कक्ष ह्या रूग्णालयात दिनांक १ फेब्रुवारी, १९९१ पासून सुरू करण्यात आला असून भाजलेल्या रूग्णांना ह्या कक्षात उपचारासाठी दाखल करून घेण्यात येते.

ह्या रूग्णालयामध्ये अन्न व औषध प्रशासन प्रमाणित मध्यवर्ती विश्लेषण प्रयोगशाळा कार्यरत आहे. चांगल्या दर्जाच्या औषधाचा पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी हि प्रयोगशाळा मुंबई महानगरपालिकेची एकमेव प्रयोगशाळा आहे.

सन २००६ – ०७ ह्या आर्थिक सालामध्ये कस्तुरबा रूग्णालयामध्ये अद्यावत संदर्भ निदान प्रयोगशाळा (Molecular Diagnostic Laboratory) स्थापन करण्यात आली. ह्या प्रयोगशाळेचे दि. २५.०४.२००७ रोजी उदघाटन होऊन सदर प्रयोगशाळा कार्यान्वीत झाली.

ह्या प्रयोगशाळेमध्ये डेंग्यू, लेप्टोस्पायरोसीच्या,एच.आय.व्ही व्हायरल लोड आणि ई.आ.डी. ह्या रक्त चाचण्या पी.सी.आर पध्दतीने केल्या जातात. ह्या प्रयोगशाळेत स्वाईन फल्यूची चाचणी करण्यात येते.

मृत्यूनंतर मृतदेह फक्त २४ तासांमध्ये तो मोटारीने पोहचू शकत असेल अशा मुंबई बाहेरच्या ठिकाणी नेण्याची परवानगी ह्या रूग्णालयातून देण्यात येते.

**सही/**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**